आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१२ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- फ्रान्समधल्या ऐतिहासिक मार्सेली शहरात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं जंगी स्वागत

- देशाच्या प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत १४ पूर्णांक ६९ शतांश टक्के वाढ

- राजकीय पक्षांनी निवडणुकीपूर्वी मोफत वस्तू द्यायच्या घोषणा करण्याच्या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मिश्र दुहेरी टेबल टेनिस स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या तीन जोड्यांची दमदार कामगिरी. पदकतालिकेत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

**आणि**

- आशिया मिश्र सांघिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताची आगेकूच

**<><><><><>**

फ्रान्समधल्या ऐतिहासिक मार्सेली शहरात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आज जंगी स्वागत झालं. त्यांच्या स्वागतासाठी तिथला भारतीय समुदाय मोठ्या संख्येनं उपस्थित होता. तिथल्या पहिल्या भारतीय वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. त्याशिवाय उभय देशांचा संयुक्त प्रकल्प असलेल्या थर्मोन्युक्लिअर एक्सपरिमेंटर रिॲक्टर प्रकल्पाला प्रधानमंत्री भेट देतील. तसंच पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या भारतीय सैनिकांना मजारग्यूज युद्ध स्मशानभूमीत श्रद्धांजली अर्पण करतील. मार्सेली शहराबरोबर भारताचे ऐतिहासिक संबंध असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

फ्रान्सचा दौरा आटोपून प्रधानमंत्री बुधवारी दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर रवाना होणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी  सुंदर पिचई यांची काल भेट घेतली. डिजिटल परिवर्तनाच्या प्रक्रियेत भारत आणि गुगल मिळून कसे काम करू शकतात यावर दोघांमधे चर्चा झाली. कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेत प्रधानमंत्री मोदी यांची भेट घेऊन आनंद वाटला. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भारतासाठी उपलब्ध होणाऱ्या संधी आणि डिजिटल परिवर्तन याबद्दल आपली चर्चा झाली असं पिचई यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टमधे म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि फ्रान्समधील द्विपक्षीय संबंध परिपक्व होत असताना व्यवसायाचा व्यापही वाढत आहे, असं मत परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं. ते काल १४ व्या भारत-फ्रान्स मुख्य कार्याध्यक्षांच्या मंचाचं उद्घाटन करताना बोलत होते. भारत आणि फ्रान्स ही स्वतंत्र विचारसरणीची परंपरा असलेली राष्ट्रे असून दोन्ही देशातील सहकार्यामुळे मेक इन इंडिया धोरणालाही लाभ होईल असं डॉ. एस. जयशंकर यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

दिल्ली भाजप निवडणूक व्यवस्थापन समितीची पहिली बैठक नवी दिल्लीत सुरू आहे. दिल्ली भाजपचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेव आणि पक्षाचे दिल्ली निवडणूक प्रभारी बैजयंत पांडा आणि अलका गुजर या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आहेत. या बैठकीला खासदार रामवीर सिंग बिधुरी, बांसुरी स्वराज, प्रवीण खंडेलवाल, हर्ष मल्होत्रा आणि विष्णू मित्तल यांच्यासह भाजप नेते उपस्थित आहेत.

**<><><><><>**

देशाच्या प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत १४ पूर्णांक ६९ शतांश टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती केंद्रिय प्रत्यक्ष कर मंडळानं दिली आहे. चालू आर्थिक वर्षात १७ लाख ७८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रत्यक्ष कर

संकलित झाला आहे. वैयक्तिक प्राप्तीकर संकलनातही वाढ झाली असून यंदा ९ लाख ४७ हजार कोटी रुपये संकलन झालं आहे. ७ लाख ७८ हजार कोटी रुपये कॉर्पोरेट कर जमा झाला आहे.

<><><><><>

मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर आयुक्तांच्या नियुक्ती विरोधात दाखल याचिकांवर १९ फेब्रुवारी रोजी सुनावणी घ्यायचं सर्वोच्च न्यायालयाने आज निश्चित केलं आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार १८ फेब्रुवारी रोजी निवृत्त होणार असून त्यानंतर सरकार नव्या मुख्य निवडणूक आयुक्ताची नियुक्ती करू शकतं असं वकील प्रशांत भूषण यांनी न्यायालयाला सांगितलं. त्यावर या प्रकरणाची सुनावणी १९ फेब्रुवारीला केली जाईल, असं न्यायालयाने सांगितलं.

<><><><><>

राजकीय पक्षांनी निवडणुकीपूर्वी मोफत वस्तू द्यायच्या घोषणा करण्याच्या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त केली. मोफत वस्तूंची सवय लागली तर लोक काम करणार नाहीत,असं न्यायालयाने म्हटलं आहे. नागरी भागात बेघर लोकांच्या निवाऱ्याच्या हक्का संदर्भात न्यायमूर्ती बी आर गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या पीठासमोर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने ही टिप्पणी केली.  निवारा देण्याचा हेतू चांगला आहे, मात्र त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेणं जास्त योग्य होणार नाही का, असा प्रश्न न्यायालयाने सरकारला यावेळी विचारला.

<><><><><>

प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभामध्ये आज माघ पौर्णिमा स्नान सुरू आहे. या वर्षी १० लाखांहून अधिक भाविक यामध्ये सहभागी होत आहेत. उत्तर प्रदेश सरकारनं विशेष वाहतूक व्यवस्थेसह कडक सुरक्षा व्यवस्था तयार केली आहे. जगातला सर्वात मोठा धार्मिक मेळावा म्हणून ओळखला जाणारा महाकुंभ १३

जानेवारीपासून सुरू झाला. आतापर्यंत ४६ कोटींहून अधिक भाविकांनी संगमात पवित्र स्नान केलं आहे.

<><><><><>

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मिश्र दुहेरी टेबल टेनिस स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या तीन जोड्यांनी आपापले सामने जिंकून दमदार कामगिरी केली आहे. काश मोदी आणि तनिषा कोटेचा यांनी पश्चिम बंगालच्या रोनित भंजा आणि सुत्रिता मुखर्जी यांचा ११-३, ११-८ आणि ११-४ असा तीन सेट्स मधे पराभव केला. दुसऱ्या सामन्यात, अल्बुकर्क रेगन आणि स्वस्तिका घोष या जोडीनं पश्चिम बंगालच्या आकाश पाल आणि पोयम्मती बैसिया यांच्या विरुद्ध पाचपैकी दोन सेट्स जिंकले. तर चिन्मय सोमय्या आणि रीत हृष्याने ११-४ आणि ११-७ अशा दोन सेट मधे तामिळनाडूच्या साथियान ज्ञानशेखरन आणि सेलेना दीप्ती सेल्वाकुमार यांना हरवलं. मल्लखांब स्पर्धेत सांघिक प्रकारात महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघाने रौप्य पदक पटकावलं आहे.

<><><><><>

आशिया मिश्र सांघिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताने आज मकाऊवर ५-० असा विजय मिळवला. भारताच्या सतीश कुमार करुणाकरन आणि आद्य वारियथ या मिश्र दुहेरी जोडीने पहिल्या सामन्यात इओक चोंग लिओंग आणि वेंग ची एनजी या जोडीवर २१-१०, २१-९ असा विजय मिळवला, त्यानंतर पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने चीनच्या पांग फोंग पुईवर २१-१६, २१-१२ असा विजय मिळवला. महिला एकेरी स्पर्धेत , भारताच्या मालविका बनसोडन हिने हाओ वाई चान वर २१-१५, २१-९ असा विजय मिळवला. तर पुरुष दुहेरीत, एम.आर. अर्जुन आणि चिराग शेट्टी यांनी चिन पोन पुई आणि कोक वेन वोंग या जोडीवर २१-१५, २१-१९ असा विजय मिळवला, महिला दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीने अंतिम फेरीत एनजी वेंग ची आणि पुई ची वा या चिनी जोडीवर २१-१०,

२१-५ असा विजय मिळवला. या विजयासह भारताने उपांत्यपूर्व फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. गट विजेता ठरवण्यासाठी भारताचा पुढील सामना कोरियाशी होईल.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड दरम्यान मर्यादित षटकांचा एकदिवसीय मालिकेतला तिसरा आणि अंतिम क्रिकेट सामना आज अहमदाबादमधल्या नरेंद्र मोदी मैदानावर होत आहे. दुपारी दीड वाजता खेळाला सुरुवात होईल. इंग्लंडच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेत भारतानं २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.

<><><><><>

दुबईत होणाऱ्या आयसीसी अजिंक्यपद करंडक स्पर्धेत भारताचा हुकमाचा एक्का जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराह पाठदुखीमुळे खेळू शकणार नाही. त्याच्याऐवजी हर्षित राणाला संधी देणार असल्याचं क्रिकेट नियामक मंडळानं जाहीर केलं. यशस्वी जयस्वालच्या ऐवजी वरुण चक्रवर्तीची वर्णी लागणार आहे. संघाचं नेतृत्व रोहित शर्माकडे आहे. भारताचा पहिला सामना येत्या २० फेब्रुवारीला बांगलादेशबरोबर होणार असून २३ फेब्रुवारीला पाकिस्तानबरोबर असेल. अ गटातला भारताचा शेवटचा सामना न्यूझीलंडबरोबर येत्या २ मार्च रोजी असेल.

<><><><><>

जीबीएस अर्थात गुईलेन बॅरे सिंड्रोमने ग्रस्त असलेल्या एका रुग्णाचा काल मृत्यू झाल्याची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत पत्रकात दिली आहे. हा रुग्ण २३ जानेवारी रोजी नायर रुग्णालयात दाखल झाला होता. दाखल होण्याच्या १६ दिवसांआधी तो पुण्याला जाऊन आला होता. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. एका १६ वर्षांच्या जीबीएसग्रस्त मुलीवरही नायर रुग्णालयात

उपचार सुरू असून तिची प्रकृती सुधारत असल्याची माहिती पालिकेने पत्रकात दिली आहे.

**<><><><><>**

नैराश्य, तणाव कुणालाही होऊ शकतो, मात्र आपल्या भावना लपवून न ठेवता त्या व्यक्त करणं गरजेचं आहे, असं अभिनेत्री दीपिका पदुकोण म्हणाल्या. परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यक्त झाल्याने आपल्या मनावरचा भार हलका होतो, आणि आपण परीक्षेचा अभ्यास चांगल्या प्रकारे करू शकतो असं त्या म्हणाल्या.

**//<><><><><>//**